बृहन्मुंबई महानगरपालिका

घन कचरा व्यवस्थापन खाते जी/उत्तर विभाग

क्र.जी/उ/ १७६२ /स.अभि(घ.क.व्य)/एस.आर.दि. ०३.११.२०२६

स्वारस्य अभिव्यक्ती

जाहिरात

विषय :- जी/उत्तर विभागातील धारावी विभागातील प्रभाग क्र १८७ मधील म्हाडातर्फे नव्याने बांधण्यात आलेल्या स्काय वॉक (माहिम रेल्वे स्टेशन पुर्व ते अभ्युदय बँक) तसेच प्रभाग क्र. १८३ मधील सायन भुयारी मार्ग येथे साफसफाई करण्याकरिता संस्थाची नियुक्ती करण्याबाबत .

उपरोक्त विषयानुसार जी/उत्तर विभागातील विभागातील धारावी विभागातील प्रभाग क्र १८७ मधील म्हाडातर्फे नव्याने बांधण्यात आलेल्या स्काय वॉक (माहिम रेल्वे स्टेशन पुर्व ते अभ्युदय बँक) तसेच प्रभाग क्र. १८३ मधील सायन भुयारी मार्ग येथे साफसफाई करण्यासाठी संस्थेची निवड करण्याकरीता स्थानिक अशासकीय संस्थांची नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था,सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था , नोंदणीकृत बचत गट संस्था इ. संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

तसेच अर्ज निविदा शुल्क रु. ४००/- अधिक १८ टक्के जीएसटी असे एकूण रु. ४७२/- (ना-परतावा) आणि इसारा अनामत रक्कम (नमुद कामानुसार) नागरी सुविधा क्रेद्र येथे भरल्यानंतरच जी/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) यांच्या कार्यालयात अर्जाचा नमुना दि. ०३.११.२०२६ ते १०.११.२०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० या वेळेतच उपलब्ध होईल. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप योजनेच्या अटी व शर्तीनुसार विभागाचे सहाय्यक आयुक्त करतील.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशील व अर्जाच्या नमुन्यासाठी जी/उत्तर कार्यालयात घ.क.व्य. विभाग जी/उत्तर,पहिला मजला, रुम नं.३५ येथे संपर्क करावा. संस्थेने जी/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख १०.११.२०२६ (दु.०३.०० वाजेपर्यंत) नमूद केलेल्या कार्यालयीन कालीवधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत. तसेच सदर सोडत बाबतची तारीख व वेळ नंतर कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

सही/- (०३.११.२०२६)
सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.),जी/उत्तर